# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र.४२

क्र.झोपुप्रा/सचिव/४२/२०००/१७७९
गृहनिर्माण भवन, ५वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १२.६.२०००

विषय : महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मलून व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम -३ सी खालील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची घोषणा प्रसिध्द करण्याबाबत पध्दत निश्चित करणेबाबत.

एखाद्या झोपडपट्टीतील पुनर्वसन योजना राबवितांना काही झोपडीधारक अडथळे निर्माण करतात व स्वतःचे झोपडे तोडू देत नाहीत अशा वेळी सदर झोपडीधारकांवर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मलून व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ अंतर्गत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते. अशा वेळी सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखालील क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उपरोक्त कलमाद्वारे दिले आहेत. मात्र सदर घोषणा प्रसिध्द कशी करावी याबाबतची पध्दत प्राधिकरणाने ठरवून दिल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. आतापर्यंत १७ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांखालील क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घोषित केले आहे. सदरहू ठिकाणे Censused slum वा Notified slum असल्याने व त्या ठिकाणी योजना मंजूर करतांना किमान ७०% पात्र झोपडपट्टीवासीयांना संमती दिली असल्याने, कलम ३ सी खाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र मंजूर करतांना एक इंग्रजी व एक मराठी असे दोन स्थानिक वृत्तपत्रामध्ये ती अधिसूचना प्रसिध्द करणेची पध्दत अवलंबिली आहे. सदर पध्दतीस प्राधिकरणाने मान्यता द्यावी असे प्रस्तावित करण्यात आले व ते प्राधिकरणाने मान्य केले व त्या पध्दतीस प्राधिकरणाने दि.८.४.२००० रोजी झालेल्या नवव्या बैठकीत ठराव क्र. ९.६.४ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार यापुढे जाहीर करण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची घोषणा शासन राजपत्रात तसेच एक इंग्रजी व एक मराठी अशा दोन स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

सही /

(गौतम चटर्जी)
मुख्य कार्यकारी अधिकारी